# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


गो.वि./म.वि / 2788 दिनांक: 02/07/2022

अत्यंत महत्वाचे/

## परिपत्रक

**विषय :–महाविद्यालयातील अध्यापकांच्या करिअर (Academic Level १३ A व Level १४) ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबत**

संदर्भ :–१ .**Higher and Technical Education Department Government Resoluation No2018/C.R./18/UNI-1** शासन निर्णय दिनांक ८ मार्च २०१९ व दिनांक १० मे २०१९ नुसार

२.विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १८/०७/२०१८ च्या अधिसुचनेनुसार

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, महाविद्यालयांतील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत स्थाननिश्चिती करण्याकरिता विद्यापीठाकडुन समिती गठीत करण्यात येते. त्यानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीकडुन अध्यापकांच्या स्थाननिश्चितीकरिता शिफारस करण्यात येते. उक्त शासन निर्णय व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसुचनेनुसार स्थाननिश्चिती झाल्यानंतर सदर प्रस्ताव मान्यतेकरीता विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतु असे दिसुन येते कि, स्थाननिश्चितीकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीने सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक (**Academic Level १३ A व Level १४**) पदाचे स्थाननिश्चितीसाठी शिफारस केल्यानंतर महाविद्यालयाकडुन परस्पर मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर यांच्याकडे वेतननिश्चिती प्रस्ताव सादर करण्यात येते व वेतननिश्चिती झाल्यानंतर विद्यापीठाकडे मान्यतेकरिता प्रस्ताव सादर केले जातात. उक्तप्रमाणे होणाऱ्या प्रक्रियेमुळे भविष्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

करिता महाविद्यालयाचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांनी यापुढे स्थाननिश्चितीकरिता गठीत केलेल्या समितीने शिफारस केल्यानंतर महाविद्यालयातील अध्यापकांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे मान्यतेकरिता सादर करणे अनिवार्य राहील. विद्यापीठाने अध्यापकाच्या स्थाननिश्चितीस मान्यता प्रदान केल्यानंतरच मा. सहसंचालक यांच्या कार्यालयाकडे वेतननिश्चितीकरिता सादर करण्यात यावे. सदर प्रक्रियेचा अवलंब न करता प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना विद्यापीठाव्दारे मान्यता देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

मा. प्र–कुलगुरु यांच्या आदेशानुसार

02/7/22

( देवेंद्र एम. झाडे )

सहाय्यक कुलसचिव

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर.
४. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.